# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २४७ वा ❑ बुधवार दि.२६ नोव्हेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## भारतीय संविधान दिवस

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

भारतीय संविधान स्वीकारल्याच्या स्मरणार्थ दरवर्षी २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन साजरा केला जातो. भारतीय संविधान सभेने २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय संविधान स्वीकारले, परंतु ते २६ जानेवारी १९५० पासून लागू झाले. म्हणूनच २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन आणि २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन साजरा केला जातो. नागरिकांमध्ये संविधानाच्या मूल्यांना चालना देण्यासाठी दरवर्षी २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा करण्याचा भारत सरकारचा निर्णय १९ नोव्हेंबर २०१५ रोजी सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने अधिसूचित केला होता.

भारतीय संविधान हे देशाच्या प्रशासनाचे मार्गदर्शन करणारे नियम आणि कायद्यांचा संच आहे. संविधान हे देशाच्या प्रत्येक लोकशाही आणि धर्मनिरपेक्ष रचनेचा कणा आहे. भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठे संविधान आहे, जे सरकारच्या राजकीय तत्त्वांची, कार्यपद्धतींची आणि अधिकारांची चौकट मांडते. भारतीय संविधानाचा मसुदा तयार करण्यास २६ नोव्हेंबर १९४९ रोजी सुरुवात झाली आणि ती २६ जानेवारी १९५० रोजी लागू झाली. म्हणूनच २६ जानेवारी हा दिवस भारतात प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो. १९४९ मध्ये भारतीय संविधान स्वीकारल्याच्या स्मरणार्थ दरवर्षी २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन साजरा केला जातो.

भारतीय संविधान सभेच्या निवडणुका जुलै १९४६ मध्ये झाल्या. संविधान सभेची पहिली बैठक ९ डिसेंबर १९४६ रोजी झाली. १४-१५ ऑगस्टच्या रात्री भारत आणि पाकिस्तानची फाळणी झाल्यानंतर, संविधान सभेचे दोन भाग झाले. संविधान सभेत २९९ सदस्य होते, ज्यांचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद होते. संविधान सभेने २६ नोव्हेंबर १९४९ रोजी आपले काम पूर्ण केले आणि २६ जानेवारी १९५० रोजी भारताचे संविधान लागू झाले. मसुदा तयार करण्यासाठी दोन वर्षे, ११ महिने आणि आठ दिवस लागले.

डॉ बी.आर. आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या निर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावली. ते मसुदा समितीचे अध्यक्ष होते, म्हणूनच त्यांना ‘‘संविधानाचे जनक‘‘ म्हटले जाते. सर्व नागरिकांचे हक्क सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने त्यांनी समानता, स्वातंत्र्य आणि न्याय या तत्त्वांचा समावेश करण्यासाठी संविधानाचा मसुदा तयार केला. समाजातील वंचित घटकांना सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी त्यांनी आरक्षणासारख्या तरतुदींचाही समावेश केला.

भारतीय संविधान विशेष का आहे?

भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान आहे. संविधानानुसार, भारत एक धर्मनिरपेक्ष राज्य आहे, म्हणजेच सर्व धर्मांना समान आदर दिला जातो आणि राज्याला स्वतःचा कोणताही धर्म नाही. ही एक मजबूत केंद्र असलेली संघराज्य व्यवस्था आहे, जी केंद्र आणि राज्यांमध्ये अधिकारांचे विभाजन करून एकात्मक घटक देखील प्रदर्शित करते.

भारतीय संविधान जगातील सर्वात मोठे संविधान आहे. घटना अमलात आली तेव्हा भारतीय संविधानात ३९५ कलमे आठ परिशिष्टे होती. भारतीय संविधानात सध्या ४४८ कलमे आणि १२ परिशिष्टे अनुसूची आहेत.२२ विभाग आहेत.ज्यात विशेष तरतुदी आणि नियम दिलेले आहेत. अनेक घटनादुरुस्त्यांमुळे ती वाढली आहेत.

भारत आणि जगातील संविधानांची तुलना करताना मुख्य फरक म्हणजे भारतीय संविधान जगातील सर्वात मोठे लिखित संविधान आहे, तर काही देशांचे संविधान (जसे की ब्रिटन) अलिखित आहे. भारतीय संविधानातून अनेक देशांकडून काही वैशिष्ट्ये घेतली आहेत, जसे की संसदीय शासन प्रणाली (ब्रिटन), मूलभूत अधिकार (अमेरिका), आणि मार्गदर्शक तत्त्वे (आयर्लंड). अमेरिकेचे संविधान जगातील सर्वात लहान लिखित संविधानांपैकी एक आहे.

# पुस्तकांच्या माध्यमातून वाचनसंस्कृतीला चालना मिळावी-केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

## नागपूर पुस्तक महोत्सवाचे थाटात उद्घाटन

ज्योतिर्मय साहित्य

**नागपूर –** झपाट्याने बदलत असलेल्या जगात ज्ञान आणि तंत्रज्ञानासोबतच समृद्ध विचारही महत्त्वाचे आहेत. या साऱ्यांचे स्त्रोत पुस्तके आहेत. ज्ञानाचे हे भांडार सर्व ज्ञानशाखात समृद्ध होण्यासमवेत वाचनसंस्कृतीलाही चालना मिळायला हवी, अशी अपेक्षा केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली.

राष्ट्रीय पुस्तक न्यास न्यास आणि झिरो माईल युथ फाऊंडेशनच्या वतीने रेशीमबाग मैदानावर आयोजित नागपूर पुस्तक महोत्सवाच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, प्रसिद्ध लेखक अमिश त्रिपाठी, राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे अध्यक्ष प्रो. मिलिंद मराठे आणि झिरो माईल युथ फाऊंडेशनचे अध्यक्ष अजय संचेती यांच्यासह अनेक मान्यवरांची यावेळी उपस्थिती होती.

वाचनसंस्कृती निव्वळ मनोरंजन म्हणून केलेल्या वाचनातून घडत नाही. वाचनात विचार आणि व्यक्तिमत्व घडविण्याचे सामर्थ्य आहे. माझ्या लहानपणी वाचलेल्या अनेक पुस्तकांमधून माझ्या विचारांवर व मनावरही संस्कार घडलेले आहेत.



पुस्तकांचा आपल्या विचारांवर, जीवनावर प्रभाव पडतो, ही बाब लक्षात घेतली पाहिजे असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले.

आज आमचा देश विश्वगुरु होण्याची मनीषा बाळगतो तो ज्ञानाच्या आधार हे आपण लक्षात घेतले पाहिजे. वाचनातून ज्ञान-तंत्रज्ञानाचा विकास प्रवाहित होतो. नव्या पिढीपर्यंत वाचन संस्कृतीचे बळ पोहोचायला हवे याकडे त्यांनी लक्ष वेधले.

इतिहासाचे दाखले लक्षात घेता भारतीय मूळ परंपरा ही ज्ञानावर आधारित राहिली आहे. मध्यंतरीचा काही काळ सोडला, तर ही ज्ञानाची परंपरा कायम राहिली आहे. या परंपरेत वाचनसंस्कृतीचे स्वतःचे महत्त्व आहे. हे महत्त्व लक्षात घेता वाचनाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढणे गरजेचे आहे असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

पुण्यात मागील तीन वर्षांत आयोजित करण्यात आलेल्या अशा पुस्तक महोत्सवांना वाचकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. अक्षरशः कोट्यवधींच्या पुस्तकांची उलाढाल झाली. यावर्षी तर ८०० स्टॉल्स बुक झाले आहेत. वाचन संस्कृतीच्या दृष्टीने हे आशादायी चित्र असल्याचे ते म्हणाले.

याप्रसंगी उपस्थित श्रोत्यांपुढे बोलताना प्रसिद्ध लेखक अमिश त्रिपाठी यांनी अगदी काल्पनिक विषयांसह सर्व प्रकारची पुस्तके वाचण्याचा सल्ला दिला. वाचनाच्या माध्यमातून आपले विचार घडतील, प्रगती साधण्यास मदत होईल, असे ते म्हणाले.

या पुस्तक महोत्सवाच्या जोडीला झिरोमाईल लिटरेचर फेस्टिव्हल तसेच सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजनही करण्यात आल्याची माहिती यावेळी राष्ट्रीय पुस्तक न्यासचे अध्यक्ष मराठे यांनी दिली. नऊ दिवस चालणारा हा पुस्तक महोत्सव खऱ्या अर्थाने नागपूरकरांचा उत्सव असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकात पाटील यांनी पुस्तक महोत्सवातील विविध दालनांना भेट देऊन पुस्तकांची माहिती घेतली. पुस्तक महोत्सवातील बाल मंडपात गडकरी यांच्या हस्ते लहान मुलांना पुस्तके भेट देण्यात आली. देशभरातील सुमारे तिनशे प्रकाशक या पुस्तक महोत्सवात सहभागी झाले आहेत. हे प्रदर्शन ३० नोव्हेंबर पर्यंत सुरू राहणार आहे.



# जिल्हास्तरीय ‘‘किल्ला बनवा‘‘ स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

ज्योतिर्मय साहित्य

पुणे (प्रतिनिधी) भारतीय संस्कृती संवर्धक संस्था व पतित पावन संघटना,श्रीराम नवमी उत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दीपावली निमित्त ‘‘किल्ले बनवा स्पर्धा २०२५‘‘ चा पारितोषिक वितरण समारंभ शनिवार पेठ येथील मोतीबाग कार्यालयात संपन्न झाला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुणे महानगर संघचालक रवींद्र वंजारवाडकर, शाहीर हेमंतराजे मावळे, पतित पावन संघटनेचे संस्थापक सदस्य शिवाजीराव चव्हाण, विश्व हिंदू परिषदचे प्रांत मंत्री किशोर चव्हाण व भारतीय संस्कृती संवर्धक संस्थेचे विश्वस्त बाजीराव मणेरे यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके वितरित करण्यात आली.

रोख रक्कम, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते.

स्पर्धेतील विजेते वैयक्तिक गट

प्रथम क्रमांक- वेद नकुल इनामदार रोख रक्कम रुपये पाच हजार, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र, द्वितीय – रूपेश आदमाणे रोख रुपये तीन हजार, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र, तृतीय – सुमेध निलेश गुजर रोख रुपये दोन हजार,सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र, उत्तेजनार्थ – अनिश काची सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र

सांघिक गट प्रथम क्रमांक- गावकोस दत्त प्रतिष्ठान रोख रुपये पाच हजार, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र, द्वितीय – महाराज ग्रूप रोख रुपये तीन हजार, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र, तृतीय – प्रल्हाद सायं शाखा रोख रक्कम रुपये दोन हजार, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र, उत्तेजनार्थ – शिवशंभो प्रतिष्ठान सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र.


पुणे जिल्ह्यातील नागरिकांसाठी किल्ले बनवा स्पर्धा घेण्याचे संस्थेचे दुसरे वर्ष आहे. या स्पर्धेत एकूण ९५ स्पर्धक होते. ६५ वैयक्तिक व तीस सांघिक असे.

व प्रोत्साहन पर ५७ जणांना पारितोषिके देण्यात आली. सर्व स्पर्धकांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देण्यात आले.

ऋतुराज बलकवडे, अथर्व साळुंखे, कृष्णा भल्ला व वेदांत दंडूले यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

या कार्यक्रमाचे सूत्र संचलन किरण गांधी यांनी केले.प्रास्ताविक उदय पंचपोर यांनी केले.योगेश खाटपे यांनी स्पर्धकांची नावे घोषित केली.आभार प्रदर्शन पतित पावन संघटना,श्रीराम नवमी उत्सव समितीचे विश्वास मणेरे यांनी केले.

## वास्तुशास्त्र पेंटिंग



लघुलेख -१०१

'वास्तुशास्त्र पेंटींग' मधील सर्वात महत्वाचा घटक म्हणजे 'रंग'...!! 'रंगां' मुळेच आपल्याला पेंटींग पहायला मिळते. रंगांपासून निघणारी तेजो किरणेच आपल्या डोळ्याच्या रेटीना व्दारे थेट 'सिल्व्हा माईड' अथवा 'डाव्या मेंदू' पर्यंत पोहोचतात आणि आपल्याला 'रंगज्ञान' होते.

आजच्या लेखात आपण 'वास्तुशास्त्र पेंटींग' मध्ये वापरल्या जाणाऱ्या 'पिवळ्या' रंगाचं महत्व आणि 'पिवळा' रंग, पेंटींगच्या माध्यमातून त्या वास्तुमध्ये कशा पद्धतीचे वातावरण तयार करतो, या बद्दल माहिती घेऊयात. हा सकारात्मकतेचं, उर्जेचं प्रतीक आहे. आनंद, आशावाद आणि बुद्धीवर्धक म्हणून त्याचे गुण आहेत. सूर्यनारायण जेव्हा क्षितिज रेषे जवळ असतात तेव्हा त्यांच्या प्रकाशाचा रंग पिवळाच असतो.


स्मरणशक्ती, एकाग्रता, शुभकारक विचार आणि समृध्दी-ऐश्वर्याचं प्रतीक म्हणून 'पिवळ्या' रंगाला मानलं जातं. हिन्दू धार्मिक कार्यातही 'पिवळ्या' रंगाचा आणि पिवळ्या रंगांच्या वस्तूंचा उपयोग केला जातो. धार्मिक आणि सांस्कृतिक; मानसिक आणि भावनिक; ऊर्जा आणि आरोग्य; या साठी तर 'पिवळा' रंग हा अत्यंत उपयोगी, उपकारक आणि लाभदायक असतो. या शिवाय 'पिवळा' रंग सतत् पाहण्याने पिवळ्या रंगांच्या वस्तु वा चित्राकार यांच्याकडे पाहण्याने किंवा पिवळ्या रंगाची वस्त्रे, कपडे परिधान करण्याने नेतृत्वगुण, स्वाभिमान आणि स्वयंशिस्त अंगी बाणली जाते. इच्छाशक्ती आणि संघर्ष करण्याची तयारी दृढ होते. या शिवाय निर्णायक घटके पर्यंत पोहोचणे हे गुण पिवळ्यामुळे अंगी बाणले जातात.

पिवळा रंग हा 'गुरु' ग्रहाशी संबंधित आहे. गुरुचे रत्न देखिल 'पिवळ्या' रंगाचे असते. त्यामुळे तो मानसिक क्रियाशिलता उत्तेजित करून समोरच्याचे लक्ष वेधून घेऊ शकतो. या रंगाच्या प्रभावाखाली 'फूड इंडस्ट्री,' 'क्रिडा क्षेत्र', 'स्पा' ब्युटी पार्लर, 'इंटेरियर डेकोरेशन', टेबल मॅट्स', मॅट्रीक्स, छपाई, पोस्टर्स, टॅक्सी, कॅब, रिक्षा, स्कूलबसेस इ. साठीच्या व्यवसायात वृद्धी देतो कारण तो फायदेशीर ठरतो. या अतिरेकाचे कांही नकारात्मक परिणाम देखील आहेत. आवेग पूर्ण कृती, पैशांचा दुरुपयोग, अहंकार, अती वेग अशा बाबतीत नुकसान पोहोचवतो.

क्रमश :

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान

डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238




# जात्यावरच्या ओव्या......

तुझ्या नावाची बांगडी
भरली रे मनगटी
हिनं काढलं रगत
तरी हसू गाली ओठी ॥३६३॥

हात धरे भरतार
हात हिरव्या चुड्याचा
संसाराची दोन चाक
पांडुरंग रखुमाईचा ॥३६४॥

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# अद्भूत, अदम्य, अनुपम, अनुकरणीय ... !





ज्योतिर्मय साहित्य

मंजिल उन्हीको मिलती हैं जिनके सपनोमें जान होती हैं
पंखोसे कुछ नहीं होता, हौसलोंसे उडान होती हैं ।।


या ओळींचा प्रत्यय यावा अशी बातमी रविवार दिनांक ४ मे २०२५ च्या लोकसत्तेत वाचायला मिळाली आणि आश्चर्याला पारावर राहिला नाही. अशी कोणती बातमी होती ती ? ती बातमी होती अमूर फाल्कन या पक्ष्याबद्दल. मूळचा सैबेरियातील अमूर नदीकाठचा हा पक्षी. म्हणून अमूर फाल्कन ! कबूतरापेक्षा किंचित मोठा. रंग राखाडी आणि लाल रंगाचे पाय नर आणि मादी यांच्या दिसण्यात किंचित फरक केला आहे.
शिकारी पक्षांमधील सर्वात लांब स्थलांतर करणारे हे पक्षी !

सैबेरियातून प्रचंड अंतर पार करून भारतात हा पक्षी येतो. या पक्ष्याला भारतीय वन्यजीव संस्थेने उपग्रह टॅगिंग केले होते. त्यामुळे त्याची सविस्तर माहिती मिळणे शक्य झाले. सहनशक्ती आणि उल्लेखनीय पराक्रमासाठी ओळखला जाणारा हा पक्षी सोमालियाहून अवघ्या ९३ तासात ३८०० किमीचे अंतर पार करून भारतात परतला. या बातमीत पुढे म्हटले आहे की या पक्ष्याने एवढ्या मोठ्या प्रवासात कुठेही न थांबता सरासरी ४१ किमीचा ताशी वेग कायम राखला. म्हणजे जवळपास चार हजार किमीचे अंतर या पक्ष्यांनी सलगपणे कापले होते. दरवर्षी हजारोंच्या संख्येने हे परदेशी पाहुणे आपल्या देशात मणिपूर आणि नागालँडमध्ये येतात. आणि उत्तरेकडे प्रयाण करण्यापूर्वी येथे थोडी विश्रांती घेतात. मणिपूर आणि नागालँड म्हणजे जणू त्यांचे इंधन भरण्याचे ठिकाण !




हे सगळं वाचून मला आठवलं डॉ रिचर्ड बाख यांचं जोनाथन लिव्हिंग्स्टन सीगल हे सुंदर पुस्तक. या पुस्तकाचे मराठी भाषांतर उपलब्ध आहे. विक्रमी खपाचे केवळ शंभरेक पानांचे हे पुस्तक अक्षरशः झपाटून टाकते आणि एका वेगळ्या अद्भुत अनुभवाचे आपण साक्षीदार होतो. पांढराशुभ्र बगळ्यासारखा दिसणारा जोनाथन हा समुद्रपक्षी या कथेचा नायक. समुद्राच्या किनाऱ्यावर असंख्य वेगवेगळ्या प्रकारचे पक्षी आपल्याला आढळतात. वेगवेगळ्या जातींचे आणि रंगांचे. पण हे सगळे समुद्रपक्षीच ! या सगळ्या समुद्रपक्ष्यांचे एक वैशिष्ट्य मात्र समान आहे. ते समुद्राच्या पृष्ठभागालगत लाटांच्या वर उडतात. उडत उडता आपलं भक्ष्य म्हणजे समुद्रातील मासे दृष्टीपथात आलं की त्यावर अचूक झडप घालून ते मटकावतात. पण हे समुद्रपक्षी फारसे उंच मात्र उडू शकत नाहीत. साधारणत: समुद्रपक्ष्यांचं जगणं साधं, सरळ असतं. दोन वेळेच्या खाण्यासाठी धडपडणं, पोट भरणं, पिल्लांना जन्म देणं इतकंच. छोट्या-मोठ्या कारणांवरून भांडणं, तंटे करणं किंवा कळपाकळपाने राहणं. हेच त्याचं रुटीन जगणं असतं; पण जोनाथन मात्र वेगळा असतो या सर्वांमध्ये. आकाशात भरारी घेणं ही त्याची आवड नव्हे तर पॅशन असते. त्यात त्याला अपरिमित आनंद मिळत असतो.

(क्रमशः)






उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# सृष्टीकथन

ज्योतिर्मय साहित्य

‘‘अश्वत्थ:सर्व व्रुक्षानाम:‘‘ सर्व व्रुक्षामध्ये मी पिंपळ मीच आहे. सर्व व्रुक्षामध्ये पिंपळ माझी विभूती आहे. पिंपळ तोडला तर तो लगेच तुटतो.याला शस्त्रें तोडू शकत नाहीत, अग्नी जाळत नाही, पाण्यात कालवले जात नाही. म्हणजेच ईथे आपण असा अर्थ लावू शकतो की पिंपळ तुटतो,जळतो,बुडतो,पाण्यात कालवला जातो याचा अर्थ तो नाशवंत आहे. दोन्ही वचनांची एकवाक्यता कशी ठेवायची तर मी म्हणेन की सद्गुरू च्या मुखाने श्रवण केले म्हणजे अशा वाक्याचा समन्वय साधता येतो.

तो एकरूप, नित्य नवा निर्मल, पवित्र व अचल असतो. तो सर्वाच्या ह्ददयात साक्षी रूपाने वास करतो. मानवी कल्पनांच्या पलीकडे तो पोहचलेला असतो. तो निर्गुण असल्याने त्रिगुणरहित असतो. हे ‘‘गुरूगीतेचे‘‘ वचन आहे. या स्वरूपाचे ध्यान लागल्यावर सर्व द्रुष्य मावळते. मग तेथे हे ‘‘हे विश्व आहे ते मिथ्या आहे‘‘अशी जाणीव उरत नाही.

ज्ञानी माणसाच्या मते सद्गुरू ओळखला तो कसा ते आता एका. ज्ञानी म्हणतो, आधी सद्गुरु शोधावा. त्याला ओळखावे. त्याच्या संगतीने व उपदेशाने हे विश्व मिथ्या आहे हे असा निश्चित अर्थ ह्दयात साठवावा. पण या ज्ञानी माणसाचें म्हणणे काही श्रोत्यांना आवडले नाही तो वाद घालु लागला तो म्हणतो,‘‘श्रीकृष्णाला तुम्ही अज्ञानी कसे म्हणता.‘‘

‘‘जीवभूत:सनातन:‘‘

असे गीतेचे वचन आहे. हे वचन सांगणा-या श्रीकृष्णाला तुम्ही अज्ञानी कसे म्हणता?


१७व्या ओवीत समर्थ अशा अज्ञानी माणसाला गीतेचे तत्वज्ञान साध्यासुध्या भाषेत समजावून सांगतात. ते कसे पहा.

गीतेमध्ये श्रीकृष्ण जे काही बोलले त्याचा खरा अर्थ तुला कळला नाही म्हणून तु विनाकारण दु:ख करतो आहेस.

‘‘अश्वत्थ:सर्व व्रुक्षानाम:‘‘सर्व व्रुक्षामध्ये मी पिंपळ मीच आहे. सर्व व्रुक्षामध्ये पिंपळ माझी विभूती आहे. पिंपळ तोडला तर तो लगेच तुटतो.याला शस्त्रें तोडू शकत नाहीत, अग्नी जाळत नाही, पाण्यात कालवले जात नाही. म्हणजेच ईथे आपण असा अर्थ लावू शकतो की पिंपळ तुटतो, जळतो, बुडतो, पाण्यात कालवला जातो याचा अर्थ तो नाशवंत आहे. दोन्ही वचनांची एकवाक्यता कशी ठेवायची तर मी म्हणेन की सद्गुरू च्या मुखाने श्रवण केले म्हणजे अशा वाक्याचा समन्वय साधता येतो.

(क्रमशः)

# संतांचे होणे म्हणजे त्यांच्या आज्ञेत राहणे



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

मी जिवंत राहावे हे जितके जरूर आहे, तितकेच परमात्म्याची ओळख करून घेणे जरूर आहे. जगात नावे ठेवीत नाहीत कोणाला? परमार्थाला वाहून घेतले तर प्रपंच नीट करीत नाही म्हणून नावे ठेवतात; तिकडे लक्ष देऊ नये. मनाच्या विषादाला कारण एकच असावे की, मी अजून भगवंताचा झालो नाही. जो भगवंताच्या इच्छेने वागतो त्याचे चांगले होते. भगवंत ठेवील त्यात समाधान मानून राहावे. भगवंताचे रूप आनंदमय आहे, आणि सृष्टीचा क्रमच असा आहे की तो माणसाला आनंदाप्रत पोहोचवीत असतो. अत्यंत दरिद्र्यालासुद्धा आनंदाची जागा असतेच. आनंदाशिवाय मनुष्य जगणेसुद्धा शक्य नाही. मी मुळात आनंदरूप असताना मग दु:खाचे गाडे कुठून आले ? मला दु:ख होते ते माझे कुठे तरी चुकते म्हणून ! मी चुकलो का बरोबर, ही शंकासुद्धा मुक्ताला येत नाही, कारण तो आणि देव एकच असतात. बद्धालाही शंका येत नाही. कारण तो देव जाणतच नाही; ‘सर्व काही मी करतो, आणि देव नाहीच,’ म्हणून म्हणतो. मुमुक्षूला मात्र ही तळमळ लागते. जेव्हा ही तळमळ तीव्र असते तेव्हा संतांची भेट होते. काही पूर्वीचा ठेवा असल्याशिवाय अशी तळमळ लागणार नाही.

आपण संतांचे होऊन राहावे. त्यांचे झालो म्हणजे त्यांच्याशिवाय आपल्याला कुणी नाही असे वाटले पाहिजे. संतांचे होणे म्हणजे त्यांच्या आज्ञेत वागणे. ते सांगतील तसे करावे, ते वागतील तसे नाही वागू. सत्याची संगत धरली म्हणजे सत्संगती मिळते. कशाचीही आसक्ती न धरता जगात वागणे हेच मुक्तांचे लक्षण. हवेपण नाहीसे झाले म्हणजे मग दु:खाचे कारणच राहात नाही.

जिथे तुम्ही राहता तिथे सद्गुरू आहेतच असे तुम्हाला वाटते आणि समाधान होते, हीच त्यांची खरी कृपा होय. श्रद्धेने जे काम होते ते तपश्चर्येने होत नाही. आपल्या गुरूंनी सांगितल्याप्रमाणे वागणे हाच आपला परमार्थ समजा. गुरू म्हणजे साक्षात् परमात्मा. त्याची आज्ञा पाळणे हीच आपली तपश्चर्या. याहून वेगळे काही करण्याची गरज आहे असे न वाटावे.

माझ्या मनाचे विकार जात नाहीत असे चांगल्या माणसांनासुद्धा वाटते. पण ‘ते जात नाहीत, जात नाहीत’ असे घोकून त्यांचा ध्यास घेतल्याने ते उलट वाढतील. तिकडे लक्ष देऊ नये. नाम घेणे हे आपले काम करीत राहावे, म्हणजे विकार आपोआपच कमी होत जातील. मात्र, मनाच्या मागे देहाला जाऊ न देणे, इतके जपले पाहिजे.

संतांची आज्ञा प्रमाण मानणे हेच प्रचीती येण्याचे साधन आहे.




# मुलांना ठेवा परीक्षेच्या ताणापासून चार हात दूर

ज्योतिर्मय साहित्य

शिक्षणासाठी घर सोडणे :

काही विद्यार्थी बॅग

भरून कोचिंग संस्थेकडे जातात. परंतु, नवीन ठिकाणी जुळवून घेणे आणि अभ्यासाच्या वेळापत्रकांना सामोरे जाणे काहीसे त्रासदायक ठरू शकते.

पालकांचा दबाव :

परीक्षेच्या वेळी पालकांचाही गोंधळ होतो आणि प्रत्येक जण तो वेगळ्या पद्धतीने हाताळतो. शिक्षित पालक खूप अपेक्षा ठेवतात. त्यांच्या मुलांनी दुसऱ्याला मागे टाकावे, अशी त्यांची इच्छा असते.

स्मृति कमी होणे : कारणे, लक्षणे आणि उपचार...

दरवर्षी २१ सप्टेंबर हा दिवस जागतिक स्मृतीभ्रश दिवस म्हणून साजरा केला जातो. आता रविवार रोजीच तो साजरा केला गेला. त्या वर आज आपण सविस्तर चर्चा करणार आहोत.

स्मरणशक्ती कमी होणे, ज्याला स्मृतिभ्रंश असेही म्हणतात. ही अशी स्थिती आहे जिथे एखाद्या व्यक्तीला माहिती, भूतकाळातील घटना किंवा अनुभव आठवण्यास अडचण येते. याचा परिणाम अल्पकालीन स्मृती, दीर्घकालीन स्मृती किंवा दोन्हीवर होऊ शकतो. यात काही लोक अलीकडील संभाषणे, दैनंदिन कामे किंवा परिचित नावे आणि ठिकाणे विसरायची शक्यता असते.

विशेषतः जर वयाशी संबंधित आजारांशी जोडले गेले असेल तर. स्मरणशक्तीच्या समस्या असलेल्या लोकांना नवीन गोष्टी शिकण्यात किंवा अलीकडील घटनांबद्दल गोंधळून जाण्यास त्रास होऊ शकतो.

जरी स्मृती समस्या कोणत्याही वयात होऊ शकतात, परंतु त्या वृद्धांमध्ये अधिक सामान्य आहेत.

अल्पकालीन स्मरणशक्ती कमी होणे :

यामध्ये नुकत्याच घडलेल्या गोष्टी लक्षात ठेवण्यास अडचण येणे, जसे की अलीकडील संभाषणे किंवा तुम्ही एखादी वस्तू कुठे ठेवली आहे हे विसरणे. हे ताण, झोपेचा अभाव, किंवा काही औषधांचा परिणाम यामुळे होऊ शकते.

दीर्घकालीन स्मरणशक्ती कमी होणे :

यात बालपणीच्या घटना किंवा जीवनातील महत्त्वाचे अनुभव यासारख्या जुन्या आठवणी आठवण्यात अडचण येते. अल्झायमर आणि तत्सम आजारांमुळे या जुन्या आठवणींना नुकसान होते.

स्मरणशक्ती कमी होण्याची कारणे :

अल्झायमर रोग : ही मेंदूची एक अशी स्थिती आहे जी स्मृतीवर परिणाम करते. यात रुग्णांच्या तर्कशक्ती, संवाद आणि दैनंदिन क्रियाकलापांवर परिणाम होतो.

लोक लवकर गोंधळून जातात आणि दिशाहीन होऊ शकतात.

हे प्रामुख्याने वृद्धांना प्रभावित करते आणि बहुतेक प्रकरणे ६५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या लोकांमध्ये आढळतात.

स्ट्रोक : मेंदूला होणारा रक्तपुरवठा बंद पडतो तेव्हा स्ट्रोक येतो.

यामुळे स्मृतीसाठी जबाबदार असलेल्या मेंदूच्या भागांना नुकसान होते.स्ट्रोकनंतर, अल्पकालीन किंवा दीर्घकालीन स्मृती कमी होऊ शकते.

डोक्याला मार लागणे: अपघातात किंवा पडताना डोक्याला मार लागल्याने मेंदूला इजा होऊ शकते. यामध्ये स्मृती कमी होणे तात्पुरते किंवा कायमचे असू शकते.

(क्रमशः)




# शिक्षण सर्वांनाच उपयोगाचं?

ज्योतिर्मय साहित्य

मुलांची बुद्धिमत्ता

प्रत्येक मुलाची बौद्धिक क्षमता वेगवेगळी असते. काही मुलांना गणित-शास्त्रात गती असते, तर काहींना भाषांमध्ये. कोणाची तर्कशक्ती चांगली असते, तर कोणाचे स्मरणशक्तीवर उत्तम नियंत्रण असतो. त्यामुळे ‘‘बुद्धिमान म्हणजे डॉक्टर किंवा इंजिनिअरच‘‘ हा समज सोडून देणे आवश्यक आहे. मुलांच्या बौद्धिक ताकदीचा योग्य अंदाज घेऊन त्याला अनुरूप क्षेत्र निवडल्यास, त्या क्षेत्रात त्यांना उत्तम यश मिळू शकते.

हावर्ड गार्डनर या अमेरिकन संशोधकाच्या संशोधनानुसार नऊ प्रकारच्या बुद्धिमत्ता असतात आणि या बुद्धिमत्तांचा आपण नक्कीच विचार करायला हवा.

१. भाषिक बुद्धिमत्ता :

वैशिष्ट्ये : शब्दांशी खेळ, भाषेवर प्रभुत्व, वाचन-लेखनाची आवड

उदाहरण: कविता लिहिणं, गोष्टी सांगणं, भाषण देणं, निबंध लेखनात गती असलेली मुलं

करिअर : लेखक, कवी, पत्रकार, वकील, वक्ते

२. तार्किक-गणितीय बुद्धिमत्ता (लॉजिकल - मॅथेमॅटिकल इंटेलिजन्स)

वैशिष्ट्ये : तर्क, विश्लेषण, गणिती प्रक्रिया, कोडी सोडवण्याची क्षमता

उदाहरण : गणित, विज्ञानात गती असलेली, कोडं सोडवण्यात रस असलेली मुलं

करिअर : इंजिनिअर, वैज्ञानिक, अकाउंटंट, संगणक अभियंते

३. दृश्य-स्थानिक बुद्धिमत्ता :

वैशिष्ट्ये : चित्र, नकाशे, रंग, आकाशातील दिशा यांची समज

उदाहरण : चांगली चित्रं काढणं, डिझाईन करणे, कल्पकतेने वस्तूंची रचना करणं

करिअर : आर्किटेक्ट, डिझायनर, छायाचित्रकार, ॲनिमेटर.

४. संगीतिक बुद्धिमत्ता :

वैशिष्ट्ये : सूर, लय, ताल यांची समज व संवेदना

उदाहरण : गाणं, वाद्य वाजवणं, संगीत ऐकून मूड बदलणारी मुलं

करिअर : गायक, संगीतकार, व्हॉइस ओव्हर आर्टिस्ट, संगीत शिक्षक

(क्रमशः)




# कॅन्सरला टक्कर देतात ही फळे, खा आणि आयुष्य वाचवा

ज्योतिर्मय साहित्य

कर्करोग हा जागतिक स्तरावर मृत्यूसाठी प्रमुख जोखीम घटकांपैकी एक आहे. या आजाराचा धोका वर्षानुवर्षे वाढत असल्याचे आरोग्य तज्ज्ञांचे म्हणणे आहे. कर्करोग हा एक जीवघेणा आजार आहे, दुर्दैवाने बहुतेक प्रकरणांमध्ये तो रोग अत्यंत गंभीर झाल्यावरच आढळतो. कर्करोगाचा धोका पुरुषांमध्ये सर्वाधिक असतो आणि महिलांमध्ये गर्भाशय-स्तन कर्करोगाचा धोका असतो.

ते दरवर्षी लाखो लोकांच्या मृत्यूचे कारण बनत आहे.आरोग्य तज्ज्ञांचे म्हणणे आहे की सर्व लोकांनी कर्करोगापासून बचाव करण्यासाठी सातत्याने उपाययोजना केल्या पाहिजेत. ज्या लोकांना आधीच जोखीम घटक आहेत त्यांनी विशेषतः सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. संशोधकांना असे आढळून आले आहे की काही फळे आणि भाज्यांचे कर्करोगविरोधी प्रभाव देखील असू शकतात.

डाळिंब खा : डाळिंब हे आरोग्यासाठी वरदानापेक्षा कमी नाही. यामध्ये व्हिटॅमिन, पोटॅशियम आणि फायबर मुबलक प्रमाणात आढळतात. यामुळे स्मरणशक्ती मजबूत होते. तसेच, मेंदूची क्रिया वाढते. यासाठी डाळिंबाचा आहारात नक्कीच समावेश करा.

संत्री खा : संत्री आरोग्यासाठी फायदेशीर आहे. याच्या सेवनाने रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते. कॅन्सरच्या पेशी वाढण्यापासून आणि पसरण्यापासून रोखण्यासाठी संत्री देखील उपयुक्त ठरते. यासाठी कर्करोगाच्या रुग्णांनी बरे होण्यासाठी संत्र्याचा रस जरूर प्यावा. याशिवाय द्राक्षे, लिंबू यांचेही सेवन करता येते.

कर्करोगासाठी ब्रोकोली : ब्रोकोलीमुळे कॅन्सरचा धोका कमी होतो. त्यात असलेले कॅन्सर विरोधी गुणधर्म हे विशेष बनवते. ब्रोकोलीमध्ये सल्फोराफेन, क्रूसीफेरस भाज्यांमध्ये आढळणारे एक संयुग असते ज्यामध्ये कर्करोगविरोधी गुणधर्म असल्याचे मानले जाते. चाचणी -ट्यूब अभ्यासात असे दिसून आले आहे की सल्फोराफेन असलेले पदार्थ स्तनाच्या कर्करोगाच्या पेशींचा आकार आणि संख्या ७५% कमी करू शकतात.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

कर्करोगात गाजराचे फायदे : संशोधकांना असे आढळून आले की गाजर आपल्या आरोग्यासाठी देखील फायदेशीर ठरू शकते, अभ्यासातून असे दिसून आले आहे की गाजर खाल्ल्याने काही प्रकारच्या कर्करोगाचा धोका कमी होतो. पाच अभ्यासांच्या विश्लेषणात असे दिसून आले आहे की गाजर खाल्ल्याने पोटाच्या कर्करोगाचा धोका २६% कमी होतो . याशिवाय गाजर खाणाऱ्या लोकांमध्ये प्रोस्टेट कॅन्सर होण्याचा धोकाही १८ टक्क्यांनी कमी होतो

दालचिनीचे कर्करोगविरोधी प्रभाव : अभ्यासामध्ये दालचिनीचे विविध प्रकारचे आरोग्य फायदे असल्याचे आढळून आले आहे. रक्तातील साखर आणि शरीरातील जळजळ कमी करण्यासाठी याचे सेवन विशेषतः फायदेशीर ठरू शकते. टेस्टट्यूब अभ्यासात असे आढळून आले आहे की दालचिनी कर्करोगाच्या पेशींचा प्रसार रोखण्यास देखील मदत करू शकते. संशोधकांना असे आढळून आले की दालचिनीचा अर्क कर्करोगाच्या पेशी वाढण्यापासून थांबवू शकतो.

ऑलिव्ह ऑईलचे सेवन करा : संशोधकांनी ऑलिव्ह ऑइल हे ह्रदयाच्या आरोग्यासाठी सर्वात फायदेशीर खाद्यतेल मानले आहे, परंतु तुम्हाला माहित आहे का की ते कर्करोगाचा धोका देखील कमी करू शकते. अभ्यासातून असे दिसून आले आहे की कोलोरेक्टल कर्करोगाच्या जोखमीपासून तुमचे संरक्षण करण्यासाठी ऑलिव्ह ऑइलचे फायदेशीर प्रभाव देखील असू शकतात.

# वामन प्रभा क्राफ्ट

**ज्योतिर्मय साहित्य**

नमस्कार, आपल्या सगळ्यां सगळ्यांचं एक लाडक व्यक्तिमत्व म्हणजे सौ. शीलाताई तिखे (शीला वामन कुलकर्णी).

बायकांचं वय विचारू नये म्हणतात. पण याही वयात न थकता कर्तृत्व, कर्तव्य नेतृत्व या सर्वांचा खोलात जाऊन विचार करण्याची क्षमता ही तर जन्मजात देणगी लाभलेल्या शीला ताईने आज अभिमान वाटावा असे काम केले.

खरंतर असं म्हणतात मुलगी लग्न होऊन गेली की ती परक्याचे धन पण शीला ताईने आई वडीलांच्या विचारांचा संस्कारांचा वारसा जपला पुढे चालवला व तो वाढवला देखील.

ति,काका काकूंच्या पवित्र स्मृतीस मनापासून नमस्कार. शीला ताईने, सतत समाजाचा विकास पाहिला.

सप्तपदी मोफत वधूवर सुचकमंडळाचे कार्य, त्यात सतत सक्रियता दर्शवून, अनेकांचे शुभमंगल घडवून आणले. त्यांचे संसार सुखाचे



केले.

बॅग्ज, पर्स सर्व स्त्रियांचा आवडता विषय

आणि त्यासाठी अनेक गरजू महिलांना हक्काचा रोजगार मिळवून दिला. त्यांना आपल्या पायावर उभारण्यासाठी पुढाकार घेऊन त्यांच्या संसाराला हातभार लावला. कोवीड काळात अनेकांच्या हाताला रोजगार मिळवून दिला. परिचारीकेच्या शिक्षणाचा उपयोग करून घेऊन समाजाच्या उपेक्षित वंचित लोकांसाठी खूप काही कार्य केले, अजूनही न थकता न दमता अव्याहत चालू आहे.

थोडक्यात काय तर मी म्हणते कोणतंही क्षेत्र ताईला वर्ज्य नाही.

जे करायचं ते मन लावून समर्पित भावनेने.

**सौ.ऊज्वला धर्माधिकारी, पुणे**

तन, मन, धन अर्पून चंगळवादी समाजात आज अशी ध्येयवादी, ध्येयवेडी माणसं कुठं सापडतात हो!!! प्रत्येक जण फक्त स्वार्थ शोधतो .

खरयं ना ! पण सिंहगड रोडवर सनसिटीत हे व्यक्तिमत्त्व आहे.

आज आईवडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ शांतीबन वृद्धाश्रमात दीन, दुबळ्या विकलांग वृध्दांना चार तासांपेक्षा जास्त वेळ देऊन दोन शब्द व गोड घास दिला त्यांच्या चेहऱ्यावर हास्य निर्माण केले.

त्यांना आपुलकी माया, प्रेम दिले. त्यांच्या चेहऱ्यावरचे कृतार्थ भाव खूप काही सांगून गेले.

कोणत्याही पारड्यात हे वजन तोललं जाणार नाही.

किती पुण्याचं काम केलं.

जन्माला आलेल्या प्रत्येकाने गुरूऋण, मातृपितृऋण, समाजातील वंचितांच्या साठी काहीतरी समाजाचे आपण काही देणं लागतो ही भावना जागृत ठेऊन शीला ताई सारखे आदर्श काम करावे. प्रेरणा घ्यावी. ताई असेच करत रहा, समाजोपयोगी कामासाठी तुम्हा उभयतांना उत्तमोत्तम आयुरारोग्यलाभो यासाठी अनंत शुभेच्छा.


# शाळेच्या आठवणींना उजाळा देणारा ‘‘क्रांतिज्योती विद्यालय‘‘

**ज्योतिर्मय साहित्य**

मराठी शाळांची घटती संख्या, खालावलेली पटसंख्या आणि मातृभाषेतील शिक्षणाची कमी होत जाणारी आवड या सगळ्या पार्श्वभूमीवर अलीकडेच हेमंत ढोमे लिखित, दिग्दर्शित ‘क्रांतिज्योती विद्यालय – मराठी माध्यम’ या चित्रपटाची घोषणा करण्यात आली. मराठी शाळांच्या अस्तित्वाच्या लढ्याला अधोरेखित करणाऱ्या या चित्रपटाचा प्रचंड मनोरंजक असा टीझर आता प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. हेमंत ढोमे यांचे विषय हे नेहमीच तुमच्या आमच्या घरातले असतात आणि म्हणूनच ते प्रेक्षकांना अधिक जवळचे वाटतात. त्यामुळे आता या चित्रपटात पुन्हा एकदा प्रत्येकाच्या आयुष्यात आलेली शाळा आणि मग त्या काळातल्या सगळ्या आठवणी पाहायला मिळणार हे नक्की. हा चित्रपट प्रेक्षागृहात आपलं मनोरंजन करणार यावर या टीझरने शिक्कामोर्तब केल्यामुळे प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे.

टीझरमध्ये दिसतेय की, मराठी शाळा बंद होण्याच्या संकटात सापडली असताना, जुने विद्यार्थी अनेक वर्षांनी पुन्हा एकत्र येऊन शाळेला भेट देतात. या भेटीनंतर सुरू होते ती, त्यांच्या शाळेतील आठवणींची, नात्यांची आणि शाळेप्रती असलेल्या प्रेमाची नवी सफर. दिग्दर्शक हेमंत ढोमे यावेळेस प्रेक्षकांना आपल्या शालेय जीवनाची सफर घडवणार आहे. यात मराठी कलाकारांची दमदार फौज झळकणार आहे. मराठी चित्रपटसृष्टीतील दिग्गज अभिनेते सचिन खेडेकर या चित्रपटात मुख्यध्यापकाच्या भूमिकेत दिसणार असून अमेय वाघ, सिद्धार्थ चांदेकर, क्षिती जोग, कादंबरी कदम, हरीश दुधाडे, पुष्कराज चिरपुटकर या कलाकारांसोबतच मराठी चित्रपटात पहिल्यांदाच प्राजक्ता कोळी प्रमुख भूमिकेत दिसणार आहे.

लेखक आणि दिग्दर्शक हेमंत ढोमे म्हणतात, ‘‘ शाळा हा आपल्या आयुष्याचा पाया असतो. आपण घडतो ते शाळेतच.




पहिली भिती, पहिला राग, पहिली मेत्री, पहिलं प्रेम हे सारंकाही आपण शाळेतच अनुभवतो. त्यामुळेच मराठी शाळेचं हे भावविश्व रंगवताना प्रेक्षकांना त्यांच्या शाळेतल्या आठवणी अनुभवायला मिळतील याची पुरेपूर काळजी घेतली आहे प्रेक्षकांचं मनोरंजन करत मराठी शाळांचं महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न मी केला आहे मला खात्री आहे प्रेक्षकांना आपली शाळा आठवणार आणि मराठी शाळा पुन्हा भरणार.’’


येत्या नवीन वर्षात म्हणजेच १ जानेवारी २०२६ पासून ही मराठी शाळा चित्रपटगृहात भरणार आहे. क्षिती जोग यांच्या चलचित्र मंडळी निर्मित, ‘क्रांतिज्योती विद्यालय – मराठी माध्यम’ या चित्रपटाचे सहनिर्माते विराज गवस, उर्फी काझमी (क्रेझी फ्यू फिल्मस) आणि अजिंक्य ढमाळ हे आहेत. या सर्वांनी मिळूनच झिम्मा आणि झिम्मा २ या चित्रपटांची निर्मिती केली होती.

# टांग टिंग टिंगा...!

**ज्योतिर्मय साहित्य**

टांग टिंग टिंगा... नाव वाचूनच मजा वाटली ना? उत्तम लेखक, कवी श्री गिरीश वसेकर ह्यांचा बालकाव्य संग्रहाचे हे नाव आहे! गिरीशदादा उत्तम लेखक, कवी तर आहेतच पण त्याहीपेक्षा ते एक उत्तम माणूस आहेत. बोलके, सतत हसतमुख, मित्र परिवारात अत्यंत प्रिय,अजातशत्रू, मदतीला सदैव तत्पर, दुसऱ्यांची भरभरून तारीफ करणारे, सकारात्मक, आनंदी व्यक्तिमत्त्व म्हयंणजे गिरीशदादा ! माझी आणि त्यांची एका साहित्य समूहात ओळख झाली आणि बहीण भावाचं नातं तयार झालं. त्यांचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन फारच सकारात्मक आहे. नकारात्मकता ते आसपास देखील फिरकू देत नाही. आनंदात जगायचं, जे समोर येईल ते स्वीकारायचं,त्यातून मार्ग काढायचा आणि आयुष्य सुंदर करायचं हीच त्यांच्या कवितांमधली सकारात्मकता! त्यांनी विशेषतः आपलं सैरभैर मन आणि माणुसकी ह्यावर जास्त कविता केल्या आहेत, ज्यातून खूप शिकण्यासारखं आहे. गिरीशदादांना अनेक पुरस्कार लाभले आहेत.

नुकताच ज्योतिर्मय प्रकाशनतर्फे त्यांचा एक बालकाव्यसंग्रह आणि लेखात्मक पुस्तक पापा प्रकाशित झाले आहे. पालक आणि पाल्याविषयी ह्यात लेख आहेत. म्हणून त्याचं नाव पापा! मुलांनी कसे वागावे ह्यापेक्षा आईवडिलांची भूमिका कशी असावी,मुलांना वळण कसं लावावं,त्यांना मोबाईलपासून दूर कसं ठेवावं, अभ्यासाची गोडी कशी लावावी,




जुने संस्कार त्यांच्यात कसे रुजवावे हे फार सुंदर रीतीने वाचकांसमोर मांडले आहेत. जरूर हे पुस्तक विकत घ्या आणि वाचा.

**पुस्तक परीक्षण**
**सौ मधुर कुलकर्णी, ज्येष्ठ लेखिका, कवयित्री पुणे**

टांग टिंग टिंगा हा बालकाव्यसंग्रह माझ्या हातात आला आणि वाचताना मी लहान होऊन रमून गेले. मला तर ही सगळी बडबडगीते पण वाटली. पहिल्याच कवितेत त्यांनी मुलांनी शिस्त कशी पाळावी हे अगदी सहजरीत्या मुलांना आकर्षित करतील अशा ओळींमधून सांगितलं आहे.

अशा रीतीने वागल्या चिमण्या
कुणीच मोडल्या नाही रांगा,
असेच शिस्तीने वागावे
ना?
तुम्हीच मुलांनो सांगा.
टांग टिंग टिंगा की
टांग टिंग टिंगा।

उठा मुलांनो उठा ह्या कवितेत सकाळी लवकर उठण्याचे फायदे आणि महत्व सांगितले आहे.

भविष्य तुमचे उज्वल होई
अवघड काम सहज होई,
लवकर उठता नित्य
सकाळी
कळेल जीवन कठीण
नाही।

त्यांच्या गोड नातवासाठी त्यांनी एक गोड कविता लिहीलीय.

एक गोड ससा
खुदकन हसला
टुणकन माझ्या
मांडीवर बसला।

बालपण हा सगळ्यांचाच हळवा कोपरा असतो. त्या आठवणीत सगळेच रमतात.

हवे तसे मनाला
वागता येतं कधीपण,
उधळून आनंद, क्षण नी क्षण
तेच तर असतं
बालपण।

अशा ५० कवितांमधून गिरिशदादांनी लहान मुलांचं मनोरंजन केलं आहे. त्यांचा हा बालकाव्यसंग्रह आणि पापा हे पुस्तक जरूर विकत घ्या आणि लहान मुलांना भेट देण्यास तर फारच उत्तम !

गिरीशदादा, तुमचा साहित्याचा वृक्ष असाच बहरत राहो ! खूप अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

***





# मीनाक्षी मंदिर मदुराई

**ज्योतिर्मय साहित्य**

तेव्हा भगवान शिव म्हणाले, ही मुलगी अत्यंत शूर, पराक्रमी असेल जेव्हा तिला तिचा योग्य वर मिळेल त्याच क्षणी तिचे तिसरे स्तन नाहीसे होईल. ती आपला वर ओळखू शकेल. ही मुलगी म्हणजेच पार्वती असून तिचा विवाह शिव शंभूशी होईल.

या भाकिताप्रमाणे मीनाक्षी अत्यंत धाडसी शूर व पराक्रमी होती. तिने त्या राज्यावर होत असलेली आक्रमणे रोखून त्यांचा पाडाव केला. सर्वत्र विजय मिळवून तिने देवांनाही हरविले. एकदा ती वनात गमन करीत असताना तिला एक तरुण भिक्षूक दिसला. हा तरुण भिक्षूक मीनाक्षीच्या मनात भरला व हाच आपला पती आहे, असे तिला वाटायला लागले. त्याच क्षणी चमत्कार झाला व तिचे तिसरे स्तन क्षणार्धात नाहीसे झाले. या तरुणाचे नाव सुंदरेश्वर असे होते. जे साक्षात शिव प्रभू होते.



सुंदरेश्वरा सहित मीनाक्षी मदुराई शहरात परतली. तिथे तिचा विवाह सुंदरेश्वराशी लावून देण्यात आला. आणि तिचा राणी म्हणून राज्याभिषेक ही लगेच करण्यात आला.

मंदिरास दिव्य संतांच्या भेटी :

या मंदिरात आजवर अनेक संतांनी भेटी दिल्या. लाखो करोडो माणसे सतत मंदिरात दर्शनास येत असतात. ज्यांची प्रामुख्याने नोंद झाली असे तमिळ परंपरेतील महान संत, साईवा भक्त मंडळी, तेवाराम कवी, संत सबंधर, अपार तिरून बुक्का सर ,संत सुंदरर इत्यादी प्रमुख संतांच्या भेटीची नोंद आहे.

मंदिरातील उत्सव :

मंदिरात दिवसभर अनेक अनुष्ठाने चालतात प्रातःकालीन अभिषेक अलंकार पूजा आरती भूषण व संध्याकाळी विशेष आराधना चालते याशिवाय पाळणा उत्सव ही प्रेक्षणीय आहे. त्यासाठीच्या एका वेगळ्या मंडपात एक झोपाळा बांधला आहे त्यावर मीनाक्षी माता व सुंदरेश्वर स्वामी यांची प्रतिमा ठेवून त्या दोघांना झोका दिल्या जातो व त्यावेळी भक्त लोक भक्ती गीतात वातावरण भरून टाकतात.

याशिवाय अवनिमुलम नावाचा अल्वारांचा तीर्थात स्नानाचा एक विधी आहे.

मंदिरात एक स्वर्ण कमल तळे आहे या तळ्यात हे स्नान घातल्या जाते.

प्रमुख उत्सव : मीनाक्षी तिरुकल्याणम चितराई उत्सव हा उत्सव तमिळ महिना एप्रिल मे मध्ये येतो हा उत्सव ३० दिवस चालतो यातील पंधरा दिवस देवीचा राज्याभिषेक आणि विवाह आणि त्यानंतर पाचव्या ठिकाणी अलगर म्हणजे विष्णू यांची यात्रा पालखी यात्रा या दोन्हीही घटना एकत्र साजऱ्या केल्या जातात या काळात विशेष विशाल आहे रथयात्रा निघते भाविक हजारोच्या संख्येने या पालखी आपला स्पर्श व्हावा आणि आपण कृत कृतार्थ व्हावे या भावनेने पालखीचे दर्शन घेतात या काळात रोजच अन्नदान मोठ्या प्रमाणावर होते.

मदुराई चे मंदिर म्हणजे शिल्पकलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे पाषाणात साकारलेलं ते स्वर्गाचे चित्र आहे तेथील झुला मंडप सहा स्तंभाचा असून येथे दर शुक्रवारी मीनाक्षी देवी व सुंदरेश्वर भगवंतांच्या मूर्ती झोपाळ्यावर ठेवून भक्ती भावाने तो झोपाळा झुलविल्या जातो. याशिवाय तिथे अष्ट शक्ती मंडपम हा पूर्वेच्या गोपुरा कडे आहे. येथील स्तंभावर जगदंबेचे आठ रूप शिल्प म्हणून साकारण्यात आलेली आहेत. याशिवाय १००० स्तंभ असलेला एक मंडप आहे तोही खूप पाहण्यासारखा आहे या स्तंभाचे निर्माण अरियानाथ मुदली यार यांनी १५६९ मध्ये केले. याच्या प्रवेशद्वारावर घोड्यावर बसलेली अरियानाथ यांची मूर्ती आहे. तेथील प्रत्येक स्तंभावर विविध मूर्ती कोरलेल्या आहेत. या शिल्पकलेच्या उत्कृष्ट नमुना आहेत. विविध भावछटा ,आभूषणे, वस्त्र प्रावरणे पौराणिक कथा या तिथे प्रत्यक्ष अवतरल्या आहेत असा भास होतो. मूर्ती पाहण्यात देहभान हरपून जाते.

इथे मीनाक्षी माता आणि सुंदरेश्वर भगवंताचा विवाह सोहळा एका मंडपात दरवर्षी साजरा करण्यात येतो. येथे विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, पार्वती मातेचा भाऊ म्हणून प्रत्यक्ष विष्णू तिचा हात भगवान शंभूच्या हातात देऊन कन्यादानाचा विधी पार पाडतात. असे येथे सुंदर शिल्प आहे.


जगदंबेच्या मुख्य गाभाऱ्यात मध्यरात्रीनंतर कोणीही प्रवेश करत नाही. याचे कारण असे की, भगवान शिव सुंदरेश्वर रूपात रोज रात्री माते समवेत एकांतात येथे येत असतात.

एकूणच हे मंदिर पार्वती माता आणि शिवप्रभूच्या चिरंतन वासाने पवित्र झालेले असे दिव्य स्थान आहे.

जगदंबेच्या व शिवप्रभूच्या चरणावर विनम्र होऊन आपण इथे थांबूयात. पार्वती पते हर हर महादेव

जय हरी माऊली






# जीवनात व्यसनी माणसांपासून चार हात लांब रहा !

**ज्योतिर्मय साहित्य**

हल्ली व्यसनाधीन लोकांचा सुळसुळाट जिकडे पहावे तिकडे खूप वाढला आहे. निर्व्यसनी माणसे शोधायला गेल्यावर हाताच्या बोटावर मोजण्या इतकीच सापडतील. पण व्यसनाधीन माणसे शोधायला गेल्यावर आपल्याला पदोपदी सापडतील. अडाणी लोकांपेक्षा शिकलेले लोकच व्यसन करण्यात माहीर असतात. विविध क्षेत्रात काम करणारे कर्मचारी व्यसन करूनच आपले कर्तव्य पार पाडत असतात. व्यसनाच्या बाबतीत आपला भारत देश इतर देशांपेक्षा खूप पुढे गेला आहे. जगात सर्वाधिक व्यसनी लोकांचा देश म्हणून भारताची नवी ओळख निर्माण झाली आहे. शाळेत शिकणारी अगदी पहिली व दुसरीची लहान मुले, ज्यांना की अजून मिसरूडही फुटले नाही, ती सुद्धा मुले व्यसन करण्यात तरबेज आहेत. आपला सुंदर व सुजलाम सुफलाम देश दिवसेंदिवस व्यसनाच्या विखारी विळख्यात अडकला जात आहे. व्यसन करण्यात केवळ माणसेच आघाडीवर नाहीत तर महिलांचा सुद्धा व्यसन करण्यात पहिला नंबर लागतो. एका अहवालात असे प्रसिद्ध झाले आहे की, मुलांपेक्षा मुलीच जास्त प्रमाणात व्यसन करतात. फक्त एवढेच की, ग्रामीण भागात व्यसनी महिला व पुरुष कमी प्रमाणात आढळतील परंतु शहरी भागात व्यसन करण्यात मुलांपेक्षा मुली पुढे आहेत, असे एका अहवालात प्रसिद्ध करण्यात आले आहे. शहरी भागात शिक्षणासाठी गेलेली मुले व मुली आई-वडिलांच्या निदर्शनाखाली नसतात. त्यांना गावकऱ्यांचे दडपण नसते ना आई-वडिलांचे, अगदी गावातील शाळेत प्रथम व द्वितीय आलेली मुले सुद्धा शहरी भागात गेल्यावर व्यसनी मुलांच्या नादी लागून व्यसनाधीन होत असल्याचे चित्र सध्या आपल्याला शहरी भागात पाहायला मिळत आहे. तुम्ही एखाद्या क्षेत्रात कितीही बुद्धिमान व तरबेज असाल, तुम्ही मोठ्या पदावर खूप मोठे अधिकारी असाल, तुमच्याकडे खूप मोठ्या कला आहेत, तुम्ही गोरगरिबांना सढळ हाताने मदत करणारे दानशूर आहात. तुमच्याकडे चांगुलपणाचे सर्व गुणधर्म आहेत. पण तुमच्याकडे शंभर चांगल्या गुणांपैकी केवळ एक जरी वाईट गुण असला तरी त्या शंभर चांगल्या गुणांना बदनाम करणारा तो एक वाईट गुण असतो. सर्वात वाईट व माणसाला बरबाद करणारा गुण म्हणजे नशाबाज व्यसन होय. ज्या माणसाला व्यसनाची सवय असते तो माणूस सामाजिक दृष्ट्या गौण समजला जातो. मग ते व्यसन दारूचे असो अथवा गुटख्याचे असो, सिगारेटचे असो अथवा तंबाखूचे असो, शेवटी व्यसन हे व्यसनच असते. हल्ली व्यसनाने घरे कसे उध्वस्त होतात हे आपण डोळ्यांनी पाहत आहोत. खूप जणांचे संसार व्यसनाच्या अति



सेवनामुळे रस्त्यावर आले आहेत. व्यसनी माणसाच्या घरी रोज भांडण तंटे होत असतात. व्यसनी पुरुषाची बायको त्याच्यासोबत नांदायला नको म्हणत असते. व्यसनामुळे घटस्फोट घेणाऱ्या महिलांचे प्रमाण खूप वाढले आहे. मित्रहो जीवनात कोणतेही व्यसन करा चालेल, पण नशाबाज व्यसन व गुटख्याचे व्यसन चुकूनही करू नका. ज्या दिवशी तुम्ही वाईट व्यसनाच्या आहारी गेलात त्या दिवसापासून आपण विनाशाच्या मार्गाने वाटचाल करत आहात म्हणून समजा. व्यसनाच्या अति सेवनामुळे कित्येक जणांचे आरोग्य धोक्यात आले आहे. आतापर्यंत व्यसनाच्या सेवनामुळे हजारो माणसे मरणाच्या खाईत लोटली गेली आहेत. खरे तर माणसाच्या व्यसनी आयुष्याला सुरुवात शालेय जीवनापासून किंवा कॉलेज जीवनापासून होत असते. शाळेमध्ये किंवा कॉलेजमध्ये गेल्यावर बरेच विद्यार्थी विविध नमुन्याच्या मित्रांच्या सहवासात येतात. त्यांच्या सहवासात राहून ते सुद्धा व्यसन करायला शिकतात. शाळेच्या वर्गात जाऊन बघितल्यावर विद्यार्थ्यांनी पिचकाऱ्या मारून वर्गाचे कोपरे रंगवून टाकलेले आपल्याला दिसतील. शालेय जीवनात विद्यार्थ्यांच्या व्यसनाधीन आयुष्याला सुरुवात होते आणि कॉलेज जीवनात गेल्यावर विद्यार्थी नंबर एकचा अट्टल व्यसनी म्हणून ओळखला जातो. शाळेमध्ये विद्यार्थी कितीही हुशार असू द्या, भलेही तो प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊ द्या पण कॉलेज जीवनात गेल्यावर तो असाच नंबर एकचा हुशार विद्यार्थी म्हणून राहील याची शाश्वती कोणीही देऊ शकत नाही. कारण आपण बघतोय की, दहावी बोर्ड परीक्षेत शाळेत प्रथम आलेले विद्यार्थी महाविद्यालयीन जीवनात गेल्यावर व्यसनाच्या आहारी जाऊन स्वतःचे आयुष्य अधोगतीला नेतात. व्यसनाच्या अतिसेवनामुळे विद्यार्थी स्वतःचे जीवन व आरोग्य धोक्यात टाकत आहेत. मायबापाला काय माहित असते की, आपला मुलगा शिकत आहे का व्यसनी बनून फिरत आहे? ते बिचारे आपला मुलगा शिकत आहे म्हणून दर महिन्याला पैसे पाठवतात पण मुलगा त्या पैशाची चीज न करता स्वतःच्या शरीराची झीज करणाऱ्या व्यसनाला पैसा उधळतात. त्यासाठी माणसाने शालेय जीवन व महाविद्यालयीन जीवन निर्व्यसनी बनून यशस्वीपणे पार पाडले की, मग मात्र विद्यार्थ्यांच्या जीवनाचे सोने होते. फक्त शालेय जीवन आणि कॉलेज जीवन विद्यार्थ्यांनी चांगल्या प्रकारे सांभाळावे. या काळात विद्यार्थ्याने चांगले, गुणी ज्ञानी, हुशार व निर्व्यसनी मुले शोधावीत व त्यांच्यासोबत जिवाभावाची मैत्री करून त्यांच्या सहवासात फुलावे. व्यसनी मुलाच्या सावलीला देखील थांबू नये, व्यसनाधीन मुलांपासून चार हात लांब राहून आपण आपले ध्येय डोळ्यासमोर ठेवून खूप खूप अभ्यास करायला हवा. आई-वडिलांनी



बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे
खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर
मो.7498715661

देखील आपल्या मुलांवर बारकाईने पाळत ठेवायला हवी. आपला मुलगा शाळेत काय करतोय? अभ्यास करतोय का व्यसन करत फिरतोय? हे तपासायला हवे. मुलगा अभ्यास करतो या भरवशावर डोळे झाकून आपण त्यांना मागेल तेवढा पैसा पुरवणे म्हणजे स्वतःच्या हाताने मुलाचे नुकसान करून घेतल्यासारखे आहे. कारण आजकाल मुले मायबापाने शिक्षणासाठी पाठवलेला पैसा व्यसनावर उधळत आहेत आणि शिक्षणाच्या नावाखाली आई-वडिलांचे आर्थिक शोषण करत आहेत. म्हणून प्रत्येक आई-वडिलांनी आपला मुलगा आपण पाठवलेल्या पैशाचे काय करत आहे? याचा विचार करूनच त्याला पैसा पाठवावा. आपला मुलगा गुणी, ज्ञानी व अभ्यासू मुलांसोबत राहतोय का व्यसनी व टुकारू मुलांसोबत राहतोय? याची शहानिशा करावी. व्यसनी मुलांच्या सहवासात राहिल्याने आपली सामाजिक प्रतिष्ठा कमी होण्याची शक्यता असते. आपण त्यांच्या सहवासात राहून स्वतःचे आरोग्य धोक्यात घालत असतो. सध्या जिकडे तिकडे व्यसनी माणसांचा सुळसुळाट असल्यामुळे चांगली माणसे मैत्री करण्यासाठी शोधावी लागत आहेत. निर्व्यसनी माणसे पृथ्वीतलावर दुर्मिळ झाली आहेत. व्यसनी, भ्रष्टाचारी, कपटी, ढोंगी व स्वार्थी लोकांचा सुळसुळाट वाढला आहे. अशा लोकांच्या सहवासात राहून स्वतःची बदनामी करून घेण्यापेक्षा व स्वतःची सामाजिक प्रतिष्ठा कमी करून घेण्यापेक्षा चांगल्या व सज्जन माणसांच्या सहवासात राहून जीवनाचे सोने करून घ्या, त्यासाठी गरज आहे ती व्यसनी माणसांपासून चार हात लांब राहून निर्व्यसनी आयुष्य जगण्याची...

# पूजा सावंतच्या दृश्य-अदृश्य मराठी चित्रपटाची इफ्फीमध्ये जादू

**ज्योतिर्मय साहित्य**

५६व्या आंतरराष्ट्रीय भारतीय चित्रपट महोत्सव म्हणजेच इफ्फी सध्या गोव्यात मोठ्या दिमाखात सुरू आहे. भारतीय सिनेसृष्टीतील दिग्गज कलाकार-तंत्रज्ञांच्या उपस्थितीमुळे इफ्फीने सर्वांचे लक्ष वेधले आहे. देश-विदेशांतील विविध भाषांमधील चित्रपटांसोबत महाराष्ट्राच्या लाल मातीतील मराठी चित्रपटही जगभरातील सिनेप्रेमी आणि समीक्षकांवर मोहिनी घालत आहेत. यामध्ये दृश्य-अदृश्य या आगळ्यावेगळ्या विषयावर आधारलेल्या मराठी चित्रपटाने प्रेक्षकांवर जणू जादू केली आहे. नुकतेच इफ्फीमध्ये झालेल्या दृश्य-अदृश्य चित्रपटाच्या शोला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत कौतुक केले.

आरएसटी कॅनव्हास निर्मित आणि मिलिंद लेले दिग्दर्शित 'दृश्य-अदृश्य' या सस्पेन्स थ्रिलर चित्रपटाची निवड प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी झाल्यापासून सगळीकडे या चित्रपटाची चर्चा रंगू लागली आहे. प्रद्योत पेंढारकर, अनिल वर्खडे, दत्ताजी



थोरात, धनंजय थोरात, पृथ्वीराज खेडकर, युवराज खेडकर आणि अश्विनी खेडकर यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. मिलिंद लेले यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. इफ्फीमध्ये दृश्य-अदृश्यची निवड होण्याचा क्षण मराठी सिनेसृष्टी, कलाकार आणि तंत्रज्ञांसाठी अभिमानाचा ठरला आहे. मराठीपासून हिंदीपर्यंत अभिनयाचा यशस्वी प्रवास करणारी अभिनेत्री पूजा सावंतने या चित्रपटात मुख्य भूमिका साकारली आहे. पूजाने साकारलेल्या व्यक्तिरेखेचे इफ्फीमध्ये खूप कौतुक झाले. चित्रपटाचा शो संपल्यानंतर प्रेक्षकांनी उभे राहून चित्रपटाच्या संपूर्ण टिमचे अभिनंदन केले आणि चित्रपट आवडल्याची पोचपावती दिली. इफ्फीमधील इंडियन पॅनोरमा या विभागात हा चित्रपट दाखविण्यात आला. इफ्फीमध्ये दृश्य-अदृश्य चित्रपटाचे चार वेळा स्क्रिनींग करण्यात आले आणि प्रत्येक वेळी रसिकांनी भरभरून दाद दिली.

आशयघन पटकथा, प्रसंगानुरुप सादरीकरण, अर्थपूर्ण संवाद, कथानकाला पोषक वातावरणनिर्मिती, कलाकारांचा सहजसुंदर अभिनय आणि दिग्दर्शक मिलिंद लेले यांचे संवेदनशील दिग्दर्शन प्रेक्षकांना शेवटच्या क्षणापर्यंत खुर्चीला खिळवून ठेवणारे ठरले. 'दृश्य-अदृश्य' हा मानवी मनाच्या गूढ गाभ्यापर्यंत नेणारा एक रहस्य आणि भावनांच्या संगमातून जन्मलेला चित्रपट आहे. आपल्या डोळ्यांना दिसणारे आणि सत्य यांच्या संभ्रमात गुरफटवून ठेवणारी पटकथा क्षणाक्षणाला उत्कंठा वाढविणारी आहे. वास्तव आणि भ्रम याच्यातील सीमारेषा धूसर होत गेल्या की सत्याचे 'दृश्य' किती 'अदृश्य' होते, हे या चित्रपटात प्रभावीपणे दाखवण्यात आले आहे. पूजा सावंतच्या जोडीला या चित्रपटात अशोक समर्थ, हार्दिक जोशी आणि अक्षया गुरव आदी लोकप्रिय कलाकार मुख्य भूमिकेत आहेत.

# कुणाच्या कृती बद्दल विचार न करता निर्णय घेणे चुकीचे ठरू शकते.

**ज्योतिर्मय साहित्य**

मनीषा आणि मनोज बहीण भाऊ होते. मनोज मनिषा पेक्षा दोन वर्षांनी लहान.पण खूप हट्टी खोडकर होता. तो मनिषा ताईला नेहमी वेगवेगळ्या प्रकाराच्या खोड्या करून जेरीस आणत असे.घरात सर्वात लहान म्हणून सर्वांचा लाडका. आई बाबा आजोबा आजी तो लहान आहे म्हणून त्याचीच बाजू घेत असत. अशीच काही वर्ष गेली. आता दोघेही बहीण भाऊ बऱ्या पैकी कळते झाले होते.




एके दिवशी आजी मंदिरात गेली होती.येताना तिला प्रसाद म्हणून तेथील पुजाऱ्यांनी दोन पेरू दिले. बरं झालं, आपल्या नातवांना ही पेरू देऊ यात असे आजीला वाटले. आजीने आपल्या जवळच्या पर्स मध्ये ते दोन पेरू घरी आणले. तिने मनिषा आणि मनोजला आवाज दिला मुलांनो या, प्रसादाचे पेरू घ्या म्हणाली. मनिषा आणि मनोज हे पेरू खाण्यासाठी बाहेर आले. आजीने पर्स मधून पेरू काढताच, मनोजने ती दोन्ही पेरू आजीच्या हातातून हिसकावून घेतली.

मनिषा रागावली. बघ ना आजी, हा असाच करतो नेहमी मला. असे मनिषा म्हणाली. तेवढ्यात मनोजने ते दोन्ही पेरू दाताने खाऊन उष्टे केले. आता मात्र मनिषा आणि आजी ही खूप रागात आली. मनिषा धावत त्याच्या जवळ गेली. दोन्ही पेरू एकटाच खात आहेस म्हणून तिने त्याच्या पाठीत धपाटा मारला.

मनोजच्या डोळ्यात पाणी आले, पण त्याने तसाच उजवा हात पुढे केला आणि ताईला म्हणाला,ताई हा पेरू ास्त गोड आहे.तुझा घसा कालपासून बिघडला आहे. तेंव्हा अश्या परिस्थितीत जास्तआंबट खाऊ नये, असे आजच मी आमच्या पुस्तकात वाचले होते,म्हणून मी दोन्ही पेरू खाऊन बघितले व तुला जास्त गोड पेरू खायला देण्यासाठी असे केले. हे ऐकून मनीषा आणि आजी दोघींचेही डोळे पाणावले. मनिषाने आपल्या लहान भावाला जवळ घेतले .त्याच्या डोक्यावरून मायेने हात फिरवला.आजीनेही त्याला जवळ घेतले.

खरंच, मनोज लहान असून आपल्या मोठ्या बहिणीची किती काळजी घेतो,हे बघून आजीला आनंद वाटला. आजी म्हणाली, बघ मनिषा माझा नातू आज किती मोठा झाला आहे. यावरून बोध काय घ्यायचा ? तर कुठलाही निर्णय घेण्यापूर्वी समोरच्या व्यक्तीच्या कृतीचा विचार करूनच विचारपूर्वक निर्णय घ्यावा. आणि घरातील कुटुंब सदस्यांची काळजी किती व्यवस्थित घेतली पाहिजे हे छोट्या मनोजने किती सहज सांगितले.

# मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक शाळेत नवीन इमारतीचा उद्घाटन सोहळा उत्साहात संपन्न !

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय एन-७ सिडको छत्रपती संभाजीनगर शाळेत नवीन इमारतीचा उद्घाटन सोहळा उत्साहात पार पडला. सदरील कार्यक्रमाचे आयोजन शाळेचे केंद्रीय मुख्याध्यापक शेख अहमद पटेल सर यांच्या मार्गदर्शनानुसार करण्यात आले.

सदरील कार्यक्रमास छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, उपायुक्त तथा शिक्षण विभागप्रमुख अंकुश पांढरे, महिला व बाल कल्याण विभागाचे उपायुक्त लखीचंद चव्हाण, फोर्ब्स कंपनीचे एक्झिक्यूटिव्ह डायरेक्टर निर्मल जगावत, फोर्ब्स रियालिटी कंपनीचे डी जी एम प्रफुल तालन,

फोर्ब्स प्रोसिजन अँड मशीन टूल्स कंपनीचे सीएफओ विक्रम नागर, फोर्ब्स कंपनीचे अधिकारी पवन सोमाणी, शिक्षणाधिकारी मा. श्री भारत तीनगोटे, शिक्षण विस्तार अधिकारी रामनाथ थोरे, समग्र शिक्षा अभियानचे सहाय्यक कार्यक्रमाधिकारी ज्ञानदेव सांगळे, आस्थापना अधिकारी बाराबोटे, निवारा इन्फ्रास्ट्रक्चर कॉन्ट्रॅक्टर सचिन जायभाये सर, माजी नगरसेवक मकरंद कुलकर्णी, माजी शिक्षण सभापती शिवाजी दांडगे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीमती ज्योतीताई खंडाळे, उपाध्यक्ष नरहरी कांबळे, स्मार्ट सिटीच्या अधिकारी श्रीमती अर्पिता शरद, पालक व शाळेच्या निवृत्त मुख्याध्यापिका श्रीमती हेमलता भुयार, महानगरपालिकेच्या विविध शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते.

फोर्ब्स कंपनीच्या सीएसआर फंडातून शाळेत सहा वर्गखोल्या व मुला मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह या नवीन इमारतीचे उद्घाटन सन्माननीय मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. २०१८ पासून ते २०२५ पर्यंत २०१८ मध्ये चार वर्गखोल्या, २०२२ मध्ये पाच वर्गखोल्या, २०२५ मध्ये सहा वर्ग खोल्या व स्वच्छतागृह असे एकूण सात कोटी रुपयांचे शालेय इमारतींचे बांधकाम फोर्ब्स कंपनीने सीएसआर फंडातून केले.आणखी नऊ वर्गखोल्या फोर्ब्स कम्पनीकडून सीएसआर फंडातून बांधून देण्यात येणार आहेत.

सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक शेख अहमद पटेल यांनी केले. उपस्थित मान्यवरांपैकी अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, निर्मल जगावत सर, प्रफुल तालन यांनी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती दीपाली औटे व आभार प्रदर्शन श्रीमती अंजली कुलकर्णी यांनी केले. याप्रसंगी महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांच्या सिंफनी संगीत पथकाने सादर केलेले स्वागत गीत व इतर गीत गायन कौतुकास्पद ठरले. स्मार्ट स्टुडन्ट एक्झाममध्ये यश संपादन करून इस्रोला भेट देणाऱ्या शाळेतील आरोही खरात या विद्यार्थिनीचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी श्रीमती सुनंदा आरदवाड, श्रीमती अनिता शेटे, सौ. संगीता अंबेकर, श्रीमती सुनिता पाटील, श्रीमती वैशाली सुरडकर, श्रीमती मंगला महाजन, श्रीमती स्वाती घोडतुरे, श्रीमती अंजली कुलकर्णी, मनोज अग्रवाल, श्रीमती दीपाली औटे, श्रीमती शिल्पा बहुरे, श्रीमती वैशाली देशमुख, श्रीमती मंजुश्री राठोड, व्यंकट जाधव, श्रीमती शुभांगी चव्हाण, दीपक पडोळ, संदीप कळंबे, ज्ञानेश्वर असोलकर, श्रीमती



पल्लवी भांडारकर, प्रीतीश सराटे श्रीमती फिरदोस नदाफ, श्रीमती सबासदफ सिद्दिकी, श्रीमती पल्लवी क्षीरसागर, सागर मगर, सुशील दांडगे, श्रीमती अश्विनी घोडके, श्रीमती अंकिता बोचरे या शिक्षक शिक्षिकांनी रमेश देवडे, विजय गायकवाड या सेवकांनी सक्रियपणे सहभाग नोंदवला.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559